**गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-ऊकाकम-२०२३/प्र.क्र.१६४/महामंडळे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १० ऑक्टोबर, २०२४.

वाचा:-

१. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शा.नि.क्र असंका१११९/प्र.क्र.११०/काम.७ अ, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९.
२.उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शा.नि.क्र. असंका-११२०/प्र.क्र.२०/काम.७अ,दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०.
३.शासन निर्णय क्र.ऊकाकम-२०२३/प्र.क्र.१६४/महामंडळे, दिनांक ३० नोव्हेंबर,२०२३.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये साखर उद्योग हा एक प्रमुख उद्योग असून सद्यःस्थितीमध्ये राज्यात कार्यरत सुमारे १२७ सहकारी क्षेत्रातील व १२९ खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांमध्ये अंदाजे ८ ते १० लाख ऊसतोड कामगार या क्षेत्रात काम करतात. बहुतांश ऊसतोड कामगार हे मराठवाडा विभागातील व विशेषतः बीड तसेच अहमदनगर, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव या जिल्हयांतील असून राज्यातील विविध जिल्ह्यांतील साखर कारखान्यांच्या परिसरातील ऊस शेती/फडावर स्थलांतरीत होऊन काम करतात.

ऊस तोडणी व वाहतूक करताना होणारे अपघात, सर्पदंश, विजेचा शॉक, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात यामुळे या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचा मृत्यू ओढवतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटूंबाचे उत्पन्न बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातात ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादमास व त्यांच्या कुटूंबास आर्थिक लाभ देण्याकरिता गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळामार्फत राज्यातील ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम, त्यांचे झोपडी व बैलजोडी यांच्याकरीता अपघात विमा योजना तसेच त्यांचे झोपडी व बैलजोडी यांच्याकरीता विमा संरक्षण योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. मात्र दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ रोजी मा. मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीमध्ये सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून राज्यातील ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम त्यांचे झोपडी व बैलजोडी यांच्याकरीता "गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना " राबविण्याबाबत निर्णय झाला. त्यास अनुसरून शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

ऊस तोडणी व वाहतूक करतांना होणारे अपघात, सर्पदंश, विजेचा शॉक, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात, यामुळे या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचा मृत्यू ओढवतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे

उत्पन्न बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातात मृत्यू झालेल्या अथवा अपंगत्व आलेल्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादमास व त्यांच्या कुटूंबास आर्थिक लाभ देण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांच्या अंतर्गत असलेल्या परंतु महाराष्ट राज्याचे रहिवासी असलेले सर्व ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम झोपडी व बैलजोडी यांच्याकरीता "गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना" राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. "गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना" या योजने अंतर्गत खालील लाभ अनुज्ञेय असतील. :-

| अ.क्र. | बाब | सानुग्रह अनुदानाची रक्कम |
|---|---|---|
| १. | आग - झोपडी आणि सामग्री | रु.१०,०००/- |
| २. | वैयक्तिक अपघात (मृत्यू) | रु.५,००,०००/- |
| ३. | वैयक्तिक अपघात (अपंगत्व) | रु.२,५०,०००/- |
| ४. | वैयक्तिक अपघात - वैद्यकीय खर्च | रु.५०,०००/- |
| ५. | बैलजोडी लहान- मृत्यू/ अपंगत्व | रु.७५,०००/- |
| ६. | बैलजोडी मोठी- मृत्यू /अपंगत्व | रु.१,००,०००/- |

**३.** सदर गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना ऊस गाळप हंगामाच्या कालावधीसाठी लागू राहील. या कालावधीत ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांना किंवा त्यांच्या बैलांना केव्हाही अपघातामुळे मृत्यू झाला किंवा अपघातामुळे अपंगत्व आले तरीही ते या योजनेंतर्गत लाभासाठी पात्र राहतील.

**४.** सदर गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेच्या लाभास पात्र असणाऱ्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांनी अथवा त्यांच्या वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभार्थी "गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना" या योजनेंतर्गत लाभास पात्र ठरणार नाही.

**५.** सदर योजनेअंतर्गत पात्रतेसाठी १) रस्ता /रेल्वे अपघात २) पाण्यात बुडून मृत्यू ३) जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणांमुळे विषबाधा ४) विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात. ५ वीज पडून मृत्यू ६) उंचावरून पडून झालेला अपघात ७) सर्पदंश व विंचुदंश ८) जनावरांच्या हल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी / मृत्यू ९) बाळंतपणातील मृत्यु १०) दंगल ११) अन्य कोणतेही अपघात इ. अपघातांचा समावेश असेल.

६. तसेच सदर गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेमध्ये १) नैसर्गिक मृत्यू २) योजना अंमलबजावणी पूर्वीचे अपंगत्व ३) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे ४) गुन्हयाच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात ५) अंमली पदार्थाच्या अंमलाखाली असतांना झालेला अपघात ६) भ्रमिष्टपणा ७) शरीरातर्गत रक्तस्त्राव ८) बैलगाडयांची /मोटार शर्यतीतील अपघात ९) युध्द १०) सैन्यातील नोकरी ११) जवळच्या लाभधारकाकडून खून या बाबींचा समावेश असणार नाही.

७. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेचे लाभ प्राप्त होण्यासाठी अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. :-

१) ग्रामसेवक यांच्याकडील ऊसतोड कामगार असल्याबाबत ओळखपत्र अथवा प्रमाणपत्र.
२) मृत्यूचा दाखला.
३) ऊसतोड कामगाराचे वारस म्हणून गाव कामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. ६. क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद.
४) ऊसतोड कामगाराच्या वयाची पडताळणी करीता शाळा सोडल्याचा दाखला / आधारकार्ड/ निवडणूक ओळखपत्र. ज्या कागदपत्रांच्या आधारे वयाची ओळख खात्री होईल अशी कोणतीही कागदपत्रे.
५) प्रथम माहिती अहवाल / स्थळ पंचनामा / पोलीस पाटील माहिती अहवाल
६) झोपडी आणि सामुग्रीचे वस्तूंचे आग/ दंगल/संप/वादळ महापूर इ.मुळे नुकसान झाल्यास नुकसानीचा फोटो, नुकसानीची यादी, पंचनामा
७) अपघाताच्या स्वरुपानुसार प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे:

अपघाताच्या स्वरुपानुसार " गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना " प्रस्तावासोबत सादर करायवाची कागदपत्रे

| अ. क्र. | अपघाताचे स्वरुप | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | रस्ता रेल्वे अपघात | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| २. | पाण्यात बुडून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल,स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टम अहवाल व अशा प्रकारच्या अपघातातील मृत व्यक्तीचे प्रेत न सापडल्यास ६ महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर कुटूंबातील सदस्याचे घोषणापत्र (Declaration) व अपघातग्रस्त खातेदाराचा बुडून मृत्यू झाल्याचे सक्षम प्राधिका-याचे तलाठी/ग्रामसेवक प्रमाणपत्र |
| ३. | विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मोर्टम अहवाल |
| ४. | वीज पडून मृत्यू | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा,पोस्ट मोर्टम अहवाल, |
| ५. | उंचावरुन पडून झालेला अपघात | प्रथम माहिती अहवाल / पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टम अहवाल |
| ६. | जंतुनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा | प्रथम माहिती अहवाल/ पोलीस पाटील अहवाल, पोस्ट मॉर्टम अहवाल, व्हिसेरा रिपोर्ट, (रासायनिक विश्लेषण अहवाल) |

| | | |
|---|---|---|
| ७. | सर्पदंश/जनावराने चावा घेणे/रेबीज/ कोणत्याही प्राण्याने जखमी केल्यामुळे अपंगत्व येणे किंवा मृत्यू ओढावणे. | उपलब्धतेनुसार प्रथम माहिती अहवाल/, पोलीस पाटील अहवाल, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल (Viscera Report), शव विच्छेदन अहवाल (P. M. Report) किंवा वैद्यकीय विश्लेषण अहवाल उपलब्ध होऊ शकत नसल्यास अशा प्रकरणी अपघातग्रस्ताच्या अपंगत्व अथवा मृत्यूबाबतचे इंडियन मेडिकल असोसिएशनचे मान्यताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाने दिलेले प्रमाणपत्र, किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र येथील सक्षम अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. श्वापदाने अपघातग्रस्ताचे शरीर ओढत नेल्यामुळे व खाऊन टाकल्यामुळे मृतदेह सापडत नसल्यास ६ महिन्यांच्या प्रतिक्षेनंतर कुटूंबातील सदस्याचे घोषणापत्र (Declaration) व अपघातग्रस्त व्यक्ती श्वापदाच्या हल्ल्यामुळे मृत्यू पावली असे सक्षम प्राधिका-याचे (तलाठी/ग्रामसेवक) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) |
| ८. | दंगलीमध्ये अपंगत्व अथवा मृत्यू | प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ९. | आगीमुळे झालेला अपघात | प्रथम माहिती अहवाल / पोलीस पाटील अहवाल, पोस्टमॉर्टम अहवाल (जर अपघातग्रस्त ऊसतोड मजूराचे शरीर आगीत पूर्णपणे जळून भस्म झाले असेल तर अपघातग्रस्तांच्या कुटुंबियांचे घोषणापत्र (Declaration) व सक्षम प्राधिकाऱ्याचे (तलाठी/ग्रामसेवक) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे) |
| १०. | बाळंतपणातील मृत्यू | बाळंतपणात मृत्यू झाला असल्याबाबत शासकीय आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांचे प्रतिस्वाक्षरीसह प्रमाणपत्र. |
| ११. | अन्य कोणतेही अपघात | प्रथम माहिती अहवाल / पोलीस पाटील अहवाल, स्थळ पंचनामा, इन्क्वेस्ट पंचनामा, आणि सक्षम प्राधिका-याने अपघात पडून मृत्यू झाल्याचे/ कायमच अपंगत्व आल्याचे दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित सत्य प्रत. |
| १२. | १.रस्ता, रेल्वे अपघात<br>२. विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात<br>३. आगीमुळे झालेला अपघात<br>४.वीज पडल्याने<br>५.सर्पदंश झाल्यामुळे | नमूद कारणांमुळे बैलास अपंगत्व आल्यास,<br>१. पशुवैद्यकीय प्राधिकरणाने जारी केलेले अपंगत्व प्रमाणपत्र.<br>२. बैलाचा कानात टॅग असलेला फोटो (३ प्रती).<br>३. साखर कारखान्याच्या कृषी कार्यालयाचा अहवाल.<br>४. पांजरपोळ गोशाळेत बैल जमा केल्याचे प्रमाणपत्र. |
| | | नमूद कारणांमुळे बैलांचा मृत्यू झाल्यास,<br>१. बैलाचा शव विच्छेदन अहवाल<br>२. बैलाचा कानात टॅग असलेला फोटो (३ प्रती)<br>३. साखर कारखान्याच्या कृषी कार्यालयाचा अहवाल |

| | |
|---|---|
| १३. | क्रमांक १ ते १२ मधील नमूद कारणांव्यतिरिक्त इतर काही कारणांमुळे मृत्यू/अपंगत्व आले असल्यास अशा विवक्षित प्रकरणात जिल्हा समितीने विभागीय समितीच्या सहमतीने निर्णय घ्यावा. |

८. जेव्हा ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम तसेच त्यांची बैलजोडी यांच्या अपघाताचे प्रकरण निदर्शनास येईल तेव्हा संबंधित अपघातग्रस्त ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचे वारसदार यांनी सर्व निर्धारीत कागदपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे ३० दिवसाच्या आत सादर करावा, यासाठी सामाजिक न्याय विभागाचे सर्व क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी संबंधितांना मार्गदर्शन करतील.

९. अपघातग्रस्त ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांच्याबाबत प्राथमिक माहिती प्राप्त झाल्यानंतर सखोल चौकशी करण्यासाठी संबंधित समाज कल्याण अधिकारी, पोलिस अधिकारी यांच्या पथकाने प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करून त्याबाबतचा अहवाल घटना झाल्यापासून ८ दिवसांच्या आत सादर करतील.

१०. संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून पात्र असलेले प्रस्ताव संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीमध्ये ३० दिवसाच्या आत सादर करण्यात यावेत. सदर समिती मार्फत मंजूर प्रस्ताव गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळास पाठविले जातील. त्यानुसार गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ यांच्यामार्फत संबंधित अपघातग्रस्त ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांच्या कुटुंबाच्या वारसदारांच्या बँक खात्यात ECS द्वारे अनुदान वाटप करण्यात येईल.

११. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाने साखर कारखान्यांकडून रू.१० प्रति टन प्रमाणे प्राप्त होणा-या निधीतून सदर खर्च करावा.

१२. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ योजनेअंतर्गत अनुदानासाठी मृत कामगाराचे वारसदार पुढील प्राधान्यक्रमाने पात्र असतील.:-

१) मृत कामगाराची पत्नी/पती
२) मृत कामगाराची अविवाहित मुलगी
३) मृत कामगाराची आई
४) मृत कामगाराचा मुलगा
५) मृत कामगाराचे वडील
६) मृत कामगाराची सून
७) अन्य कायदेशीर वारसदार

१३. "गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना" या योजनेअंतर्गत ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांच्या वारसदारांना तातडीने मदत मिळण्यासाठी या शासन निर्णयाच्या प्रस्तावनेत नमूद जिल्हयांकरीता जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना व कार्य खालीलप्रमाणे आहेत.:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद. | सदस्य |
| ३) | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४) | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ५) | पशु वैद्यकीय अधिकारी | सदस्य |
| ६) | प्रादेशिक सहसंचालक (साखर) किंवा त्यांचा प्रतिनिधी | **सदस्य** |
| ७) | व्यवस्थापक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे | सदस्य |
| ८) | सहायक आयुक्त, समाजकल्याण | सदस्य सचिव |

<u>जिल्हास्तरीय समितीचे कार्य :-</u>

१. योजने संबंधित प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे व प्रतिमहा बैठक व आढावा घेणे.
२. योजनेअंतर्गत प्राप्त प्रस्तावांची छाननी करून प्राप्त प्रस्तावांना मान्यता देणे.
३. सानुग्रह प्रस्तावातील कागदपत्रांच्या त्रुटी पुर्ततेसाठी संबंधित यंत्रणांना सूचना देणे.
४. समितीची त्रैमासिक बैठक घेण्यात यावी त्यामध्ये जिल्हयातील प्रकरणांचा आढावा घ्यावा.
५. सदर योजनेअंतर्गत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत लाभार्थी अथवा शासकीय यंत्रणामध्ये विवाद निर्माण झाल्यास त्याबाबत समाधानकारक तोडगा काढणे.
६. उपरोक्त नमूद कागदपत्रे याबाबत विवक्षित प्रकरणात अपवादात्मक परिस्थितीत सानुग्रह अनुदानाबाबत सुट देणे संबंधी निर्णय घेणे.
७. परिच्छेद क्र. ७ मधील अपघाताच्या स्वरुपाच्या संदर्भात तक्त्यात क्रमांक १ ते १२ मधील नमूद कारणांव्यतिरिक्त इतर काही कारणांमुळे मृत्यू/अपंगत्व आले असल्यास अशा विवक्षित प्रकरणात जिल्हा समितीने विभागीय समितीच्या सहमतीने निर्णय घ्यावा.
८. पात्र सानुग्रह अनुदानाचे प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठविणे.
९. जिल्हयातील सर्व लाभार्थींचे तसेच बैलजोडी यांचे नोंदणीकरण, Digital Record गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांच्याकडे उपलब्ध असण्याबाबत वेळोवेळी आढावा घेणे.

**१४.** सदर गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेचे सनियंत्रण करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग/नाशिक विभाग यापैकी वरीष्ठ सेवाज्येष्ठता असलेल्या विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभाग स्तरीय समिती स्थापन करण्यात येत असून त्याची रचना व कार्य खालीलप्रमाणे असतील. :-

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय आयुक्त, औरंगाबाद /नाशिक विभाग | ज्येष्ठतेनुसार अध्यक्ष व सह अध्यक्ष |
| २) | आयुक्त, समाजकल्याण | सदस्य |
| ३) | जिल्हाधिकारी, बीड, अहमदनगर, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव | सदस्य |
| ४) | व्यवस्थापकीय संचालक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे | सदस्य सचिव |

**विभाग स्तरीय समितीची कार्य :-**

१. योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे,

२. योजनेच्या अंमलबजावणीवेळी येणाऱ्या विविध अडचणींच्या संदर्भात निर्णय घेणे. तसेच जिल्हास्तरीय समितीने बैल जोडीच्या अपंगत्वाबाबत मार्गदर्शन मागितल्यास त्यावर निर्णय देणे.

३. परिच्छेद क्र. ७ मधील अपघाताच्या स्वरुपाच्या संदर्भात तक्त्यामध्ये क्रमांक १ ते १२ मधील नमूद कारणांव्यतिरिक्त इतर काही कारणांमुळे मृत्यू/अपंगत्व आले असल्यास अशा विवक्षित प्रकरणात जिल्हा समितीने मार्गदर्शन मागितल्यास त्यावर निर्णय देणे.

४.योजनेच्या अंमलबजावणीबाबत सहामाही आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. सर्व लाभार्थींचे तसेच बैलजोडी यांचे नोंदणीकरण, Digital Record गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांच्याकडे उपलब्ध ठेवण्याबाबत वेळोवेळी आढावा घेणे.

**१५.** सदर गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे यांची राहील. तसेच व्यवस्थापकीय संचालक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे यांनी योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रत्येक ३ महिन्यास आढावा घेऊन त्याबाबचा प्रगती अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

**१६.** प्रस्तुत योजनेबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना व्यवस्थापकीय संचालक, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे यांनी निर्गमित कराव्यात.

**१७.** प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४१०१०११२५२२१६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VARSHA DESHMUKH

Digitally signed by VARSHA DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, 2.5.4.20=318374474bdbbee0a87fa98c6ce4addbc6f40c52596bc652c9c91f0a77a35550, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B030780A012E3648CB356030F4D4BFD6DCFED5E1526059A46C087A14FE3C29A0, cn=VARSHA DESHMUKH
Date: 2024.10.10 11:14:18 +05'30'

**( वर्षा देशमुख )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

(१) मा. राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(२) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

(३) मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

(४) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई

(५) मा. उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
(६) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
(७) मा. उपमुखमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
(८) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
(९) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(१०) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(११) अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
(१३) प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृहविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती) प्रसिध्दीच्या विनंतीसह.
(१५) सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
(१६) आयुक्त (समाज कल्याण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
(१७) सर्व प्रादेशिक/सहाय्यक उपायुक्त, समाज कल्याण.
(१८) सर्व जिल्हाधिकारी,
(१९) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा), मुंबई.
(२०) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
(२१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा), नागपूर
(२२) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
(२३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
(२४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
(२५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
(२६) निवडनस्ती, कार्यासन (महामंडळे)